दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.१८ एप्रिल २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २२९ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 18 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 229 • Pages 4 • Rate 4 Rs

## ड्रग्स कुठून येतं? सरकारला माहिती नाही का?

**मुंबई**–पुणे, नाशिक आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये अमली पदार्थांची वाढती विक्री हा गंभीर प्रश्न बनत चालला असून यावर मनसे नेते अमित ठाकरे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्सची विक्री होत असताना हे नेमकं कुठून येतं, याचा सरकारला पत्ता नाही का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. या मुद्द्यावर त्यांनी सरकारच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.अमित ठाकरे यांनी सांगितले की, अमली पदार्थांचा व्यापार दिवसेंदिवस वाढत असून त्याची भीषणता आता उघडपणे दिसू लागली आहे. ज्या प्रमाणात ड्रग्स विकले आणि खरेदी केले जात आहेत, ते खरोखरच धक्कादायक आहे, असं ते म्हणाले. या वाढत्या प्रवृत्तीमुळे समाजावर, विशेषतः तरुण पिढीवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.याहूनही गंभीर बाब म्हणजे शाळांच्या परिसरातही अमली पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप त्यांनी केला. शाळांच्या जवळच बेधडकपणे ड्रग्स विकले जातात, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

# चंद्रपूरचा प्रदुषण मुक्तीचा प्लान तयार करणार-पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

## दुर्गापूर येथील कन्व्हेअर बेल्ट तसेच बेलसणी आणि घुग्घुस येथील कोल वॉशरीजची पाहणी



दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा आहे. उद्योगांच्या विरोधात आम्ही नाही. मात्र उद्योगांनी सुद्धा नियमाप्रमाणे चालावे. नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा कोणालाही अधिकार नाही. येथील उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत आहे, याची जाणीव आपल्याला आहे. त्यामुळेच आज चंद्रपूर येथे येऊन प्रत्यक्ष पाहणी केली. प्रदुषणमुक्ती संदर्भात सुरवातीला चंद्रपूरचा एक वर्षाचा, नंतर तीन वर्षाचा आणि दीर्घकालीन प्लान तयार करण्यात येईल, अशी ग्वाही पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. दुर्गापूर येथील चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राच्या कन्व्हेअर बेल्ट, बेलसणी येथील महामाया कोल वॉशरीज आणि घुग्घुस येथील विदर्भ मिनरल एनर्जी या कंपनीला भेट देऊन श्रीमती मुंडे यांनी प्रदूषणाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी जनतेसोबत संवाद साधताना त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला आमदार सुधीर मुनगंटीवार जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, चंद्रपूरचे उपविभागीय अधिकारी विशाल कुमार मेश्राम, तहसीलदार विजय पवार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डाचे अधिकारी श्री. यादव आदी उपस्थित होते. सुधीरभाऊंनी विधानसभेत प्रदूषणाबाबत प्रश्न उपस्थित केला, त्याच वेळेस मी त्यांना आश्वासित केले होते की, या प्रश्नाचा निपटारा करण्यासाठी मी प्रत्यक्ष चंद्रपूर येथे येऊन प्रदूषणाची समस्या जाणून घेईल. चंद्रपूर येथे मोठ्या प्रमाणात उद्योग असल्यामुळे येथील नागरिकांना प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे. येथील नागरिकांचे दुःख पाहण्यासाठी आज मी प्रत्यक्ष येथे आली आहे. प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. जीव अतिशय महत्वाचा असून लोकांच्या जीवाशी कोणालाही खेळू देणार नाही. उद्योगांनी प्रदुषण कमी करणारे फॉगर, फॉगिंग मशीन व इतर साधनसामुग्री त्वरीत बसवावी व नियमाप्रमाणे चालावे. अन्यथा पर्यावरण मंत्री म्हणून त्यांच्यावर अंकुश कसा ठेवायचा हे आपल्याला माहित आहे. जे अधिकारी ऐकणार नाही त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. कंपन्यांच्या प्रदुषणामुळे परिसरातील शेतकऱ्यांचा कापूस काळा पडत असून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाची त्यांना भरपाई देण्यात येईल. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे येथे आल्या आहेत. प्रदूषणाच्या संदर्भात कायद्याच्या व नियमाच्या चौकटीत निर्णय घेण्यात येईल. तसेच पर्यावरण संदर्भात एक जिल्हास्तरीय समिती तयार करण्यात येईल. प्रदूषणामुळे येथील नागरिकांना विविध प्रकारचे आजार झाले असून शेतकऱ्यांचा कापूस पूर्णपणे काळा पडत आहे. त्यांना कंपन्यांनी नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली.





# मिशन कर्मयोगी मध्ये महाराष्ट्राचा डंका

## राष्ट्रीय स्तरावर 'टॉप परफॉर्मिंग स्टेट' पुरस्काराने गौरव

दैनिक वादळ वार्ता

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मिशन कर्मयोगी' उपक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याने प्रशासकीय प्रशिक्षणात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. साधना सप्ताह २०२६ निमित्त आयोजित विशेष सोहळ्यात महाराष्ट्राला 'टॉप परफॉर्मिंग स्टेट' (उत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य) या बहुमानाने सन्मानित करण्यात आले.कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि पेन्शन मंत्रालयाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते हा पुरस्कार सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा यांना प्रदान करण्यात आला.नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात, पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री तथा कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि पेन्शन मंत्रालयाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते साधना सप्ताह २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे




मंत्रालय, विभाग आणि राज्यांचा सन्मान करण्यात आला. याच सोहळ्यात महाराष्ट्रातील 'यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी' (यशदा) या संस्थेला 'स्पेशल अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. ई-लर्निंग आणि प्रशासकीय प्रशिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या 'यशदा'ने iGOT प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करून अधिकाऱ्यांना डिजिटल कौशल्यांत सक्षम केल्याबद्दल हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला.क्षमता विकास आयोग आणि 'कर्मयोगी भारत' यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान 'साधना सप्ताह' साजरा करण्यात आला. 'तंत्रज्ञान, परंपरा आणि मूर्त परिणाम ही यामागची संकल्पना होती. ४७ लाख शासकीय कर्मचारी साधनासप्ताहमध्ये सहभागी झालें होते. ३३ लाखहुन अधिक कर्मचाऱ्यांनी विहित केलेले चार तासांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. महाराष्ट्रातील तब्बल ५ लाखांहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांनी 'ळत्रज्ञढ' या डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रत्येकी किमान ४ तासांचे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. राज्याच्या या समर्पित प्रयत्नांची दखल घेत राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राची विशेष श्रेणीत निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्राच्या प्रशासकीय शिस्तीचे आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यावर आधारित प्रतिसादाचे विशेष कौतुक मंत्री जितेंद्र सिंह यांनी केले. तसेच त्यांनी साधना सप्ताह २०२६ मधील सहभाग हा केवळ तांत्रिक नसून तो सरकारी यंत्रणेतील एका मोठ्या वर्तणूक बदलाचे प्रतिबिंब असल्याचे सांगितले. यामुळे प्रशासकीय क्षमता बांधणी ही केवळ श्रेणीबद्ध रचनेपुरती मर्यादित न राहता, ती थेट सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा घडवून आणणारी ठरेल. तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डिजिटल साधनांचा वापर करून कर्मचारी स्वतःला अपडेट करत आहेत, ही समाधानाची बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

# जातनिहाय जनगणनेत ओबीसी जातीचा समावेश करून मुद्देनिहाय जनगणना करावी-वसंत मुंडे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

आरएसएसच्या मनुवादी विचारसरणीमुळे केंद्रातील भाजप सरकारने ओबीसी जातीचा जनगणनेत समावेश केला नसल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.भारत देशामध्ये जातनिहाय जनगणना ब्रिटिश सरकारने १९३१ ला चालू केली,त्यावेळेस पासून २०११ पर्यंत अनेक सरकारने जात निहाय जनगणना केली. परंतु भारत देशामध्ये ओबीसी आरक्षणा संदर्भात बीपी मंडल आयोग १९९० लागू करण्यात आले.परंतु भाजपा पक्षाचे धोरण आरक्षण विरोधी असून केंद्रातील व्ही.पी.सिंग सरकारचा मंडल आयोगाला विरोध म्हणून भाजपने पाठिंबा काढून घेऊन सरकार पाडले. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना देशात जात निहाय जनगणना २०११ ला मुद्देनिहाय करण्यात आली.महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस बीजेपीच्या सरकारने ओबीसीचा डाटा मुद्देनिहाय देण्या संदर्भात वेळ काढून धोरण स्वीकारल्यामुळे दि.१२ जून २०१८ ला केंद्र सरकारला गुपित पत्र देऊन माहिती ठेवण्याचे सूचना आरएसएसच्या विचारधारेने बीजेपीच्या प्रत्येक राज्यातील सरकारला देण्यात आल्या त्यामुळे आरक्षण देण्यामध्ये संपूर्णपणे विलंब झाला.दीड टक्के जनगणनेचा डाटा न दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात निर्णय पेंटिंग पडला.मनमोहन सिंग सरकारने ओबीसी जनगणना संदर्भात पाच हजार कोटी रुपये खर्च केला परंतु ओबीसीचा डाटा ही राष्ट्रीय संपत्ती आहे.भारतामध्ये पशुपक्षी जनगणना होते परंतु ओबीसीची जातनिहाय जनगणना होऊन देण्यामध्ये मनुवादी भाजपा पक्षाच्या विचारसरणीचा हात आहे.संपूर्ण देशामध्ये ५२ ते ७०% टक्के पेक्षा जास्त ओबीसीची लोकसंख्या आहे.भारतामध्ये ३००० पेक्षा जास्त जाती ओबीसी विभागात असून क्रिमिनल आट रद्द करून सामाजिक शैक्षणिक आर्थिक मागासलेपणा आधारावर वर्गीकरण करून जातनिहाय ओबीसी जनगणना करण्यात यावी.ओबीसी समाज जागा झाला तर राज्यातील व केंद्रातील सरकार निवडणुकीच्या माध्यमातून बदल होऊ शकतो अशी धास्ती भाजपच्या सरकारला असल्यामुळे ओबीसी वर सतत अन्याय केला जात असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.




# मंजरथ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित समिती स्थापन विविध कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंती निमित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. दिपक खरात यांच्या अध्यक्षतेखाली जयंती उत्सव समिती निवड करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी शरद खरात यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी परमेश्वर थोरात,कोशाध्यक्ष पदी मोकिंद खरात सचिवपदी विशाल खुणे, महेश माने सहसचिवपदी विश्वास माने, महादेव थोरात संघटकपदी काशिनाथ थोरात, नामदेव पाडमुख, अर्जुन सिरसट, माणिक खुणे, श्याम खुणे, अशोक माने कृष्ण चुंबळे यांची निवड एकमताने करण्यात आली या बैठकीस सचिन पाडमुख यांच्या सह संतोष खुणे, विलास डोंगरे, सुरेश खरात,रामकिशन थोरात, सुभाष थोरात,भीमराव खुणे, सुनील खरात, बाबासाहेब डोंगरे, संदीपान पाडमुख लक्ष्मण सोनकांबळे, रमेश खुणे,रमेश खरात, अनिल खरात, अशोक खरात आकाश माने, नाना खरात, दामोदर माने, सचिन खरात, दासू माने, राधाकिश थोरात , गणेश थोरात आदिसह समाज बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते जयंतीनिमित विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये रक्तदान शिबिर, रांगोळी स्पर्धा, भाषण स्पर्धा, तसेच ह. भ. प. ज्ञानेश्वर वाबळे महाराज यांचे शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे परिवर्तनवादी कीर्तनाचा कार्यकाम ठेवण्यात आला आहे संध्याकाळी ५.०० वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य ढोल ताशा च्या गजरात फुलाची उधळण करून फडक्याची आतषबाजी करत मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.





# केजमध्ये गुटखा माफियावर पोलिसांचा धडक छापा; ९.११ लाखांचा मुद्देमाल जप्त!

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात अवैध गुटखा व सुगंधी तंबाखू विक्रीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ९ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी मस्साजोग शिवारात ही धडक कारवाई करण्यात आली.

मा. पोलीस अधीक्षक, बीड व मा. अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. दुपारी सुमारे १ वाजता सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. वेंकटराम (भा.पो.से.) यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

त्यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक जावेद कराडकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक अमिर इनामदार, पोलीस हवालदार क्र. ९९६ डापकर, पोलीस हवालदार क्र. १३८४ चोपने, पोलीस हवालदार क्र. १६८७ मोरे, पोलीस हवालदार क्र. १८८५ क्षीरसागर, तसेच पोलीस अंमलदार क्र. १७४६ इनामदार यांच्या पथकाने मस्साजोग ते काळेगाव रोडलगत असलेल्या पत्र्याच्या शेडवर दुपारी सुमारे २ वाजता छापा टाकला.



या छाप्यात रोहित असाराम देशमुख (रा. मस्साजोग, ता. केज) याच्याकडून महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूचा साठा बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी साठवून ठेवलेला आढळून आला. 'राजनिवास', 'डायरेक्टर', 'प्रिमियम शॉट' व 'सुपर साऊंड' या विविध ब्रँडचा एकूण ९,११,०४० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.सदर प्रकरणी सहायक पोलीस उपनिरीक्षक अमिर इनामदार यांच्या फिर्यादीवरून आरोपी रोहित असाराम देशमुख याच्याविरुद्ध पोलीस ठाणे केज येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक सो बीड, मा. अपर पोलीस अधीक्षक सो अंबाजोगाई यांचे मार्गदर्शना खाली श्री. वेंकटराम (भापोसे), सहाय्यक पोलीस अधीक्षक, उप विभाग केज, पोउपनि/जावेद कराडकर, श्रेपोउपनि/अमिर इनामदार, पोह/९९६ डापकर, पोह/१३८४ चोपने, पोह/१६८७ मोरे, पोह/१८८५ क्षीरसागर, पोअं/१७४६ इनामदार नेमणुक, उप विभागीय पोलीस अधीकारी कार्यालय केज यांनी केलेली आहे.

अवैध धंद्यांवर पोलिसांनी सुरू केलेल्या या कारवाईमुळे केज तालुक्यात गुटखा विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

# संपादकीय

## श्वासासाठीचा संघर्ष

दिल्लीची किंवा उत्तर भारताची सकाळ आता धुक्यासाठी नव्हे, तर धुरक्यासाठी ओळखली जाते, हे आपण अनेक वर्षांपासून पाहत आहोत. पण खरी भीतीदायक गोष्ट म्हणजे या प्राणघातक वास्तवाची आपल्याला सवय होत चालली आहे. 'आज हवा कशी आहे?' हा प्रश्न आता केवळ हवामानाचा राहिलेला नाही; तो थेट आपल्या आरोग्याशी आणि जगण्याशी जोडला गेला आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पाठीवर दप्तराबरोबर मास्कही असतो, सकाळची धाव घेणारे लोक आता मोबाइलवर एअर क्वालिटी इंडेक्स (एक्यूआय) म्हणजे हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक ( प्रदूषण पातळी ) पाहूनच बाहेर पडतात. 'स्वच्छ हवा' ही गोष्ट हळूहळू एक विशेषाधिकार होत चालली आहे, असे हे चित्र आहे.सन २०२५च्या 'वर्ल्ड एअर क्वालिटी रिपोर्ट'नुसार भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा प्रदूषित देश आहे. आपली सरासरी पीएम २.५ पातळी जागतिक आरोग्य संघटनेच्या सुरक्षित मर्यादेपेक्षा जवळपास दहापट अधिक आहे. शेजारील बांगलादेश आणि पाकिस्तान या यादीत आपल्यापेक्षा वर आहेत, याचे समाधान मानण्यात काही अर्थ नाही. एकीकडे आपण '५ ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी'ची स्वप्ने पाहतो, जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याचा दावा करतो; आणि दुसरीकडे मूलभूत स्वच्छ हवा मिळवण्यासाठीही आपण संघर्ष करत आहोत. हा विरोधाभास केवळ आर्थिक नाही; तो नैतिक आहे. विकासाची व्याख्या आपण केवळ सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) पर्यंत मर्यादित ठेवली, तर हवा, पाणी, आरोग्य यांसारख्या मूलभूत गोष्टी नकळत बाजूला पडतात. अर्थव्यवस्थेत आपण युरोप-अमेरिकेशी स्पर्धा करायची स्वप्ने पाहतो, पण हवा खराब करण्याच्या बाबतीत आपण बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्याशी खांद्याला खांदा लावून उभे आहोत. जणू काही 'कोणाची हवा जास्त वाईट' अशी नवी शर्यतच लागली आहे. जीडीपीमध्ये 'टॉप-५'मध्ये जायचे आहे, पण एक्यूआयमध्येही 'टॉप-१०'मध्ये राहायचे... हे विकासाचे नेमके कुठले प्रारूप आहे?वायूप्रदूषण आणि हवामान बदल हे वेगळे विषय नाहीत. पीएम२.५ आणि पीएम१० यांसारखे सूक्ष्म कण आणि ब्लॅक कार्बन केवळ आपल्या फुफ्फुसांवर परिणाम करत नाहीत, तर हिमालयातील बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेलाही गती देतात. हिमनद्या प्रचंड वेगाने मागे सरकत आहेत. याचा परिणाम केवळ हिमालयापुरता मर्यादित राहत नाही; तो इतर नद्यांच्या प्रवाहावर, शेतीवर आणि शेवटी अन्नसुरक्षेवरही होतो. उष्णतेच्या लाटा वाढल्या की ओझोन प्रदूषण वाढते, पावसाच्या बदलत्या पॅटर्नमुळे धूळ, दुष्काळ आणि वणव्यांची शक्यता वाढते. म्हणजेच, आज आपण जी हवा श्वासात घेतो, तीच पुढील हवामान संकटाला आकार देत आहे.भारताच्या उत्तर भागातील भौगोलिक रचना देखील या समस्येला कारणीभूत ठरते. इंडो-गँगेटिक मैदानात हिवाळ्यात तापमानाची उलट स्थिती निर्माण होते, वाऱ्याचा वेग कमी असतो आणि त्यामुळे प्रदूषक खालच्या थरात अडकून राहतात. ही एक नैसर्गिक मर्यादा आहे; पण त्यात मानवनिर्मित घटकांनी भर घातली आहे. शहरांची वाढ वेगाने झाली, पण नियोजन मागे राहिले. रस्ते रुंद झाले, पण सार्वजनिक वाहतूक तितकी प्रभावी झाली नाही. वाहनांची संख्या वाढली, पण त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याची यंत्रणा पुरेशी बळकट झाली नाही. बांधकामे वाढली, पण धूळ नियंत्रणाचे नियम कागदावरच राहिले. परिणामी, निसर्ग आणि मानवी चुकांची एकत्रित बेरीज म्हणून आजची परिस्थिती निर्माण झाली. प्रदूषणाचा प्रश्न केवळ हवेपुरता मर्यादित नाही, तो आरोग्य व्यवस्थेवर थेट परिणाम करतो. दमा, फुफ्फुसांचे आजार, हृदयविकार, स्ट्रोक हे सर्व प्रदूषणाशी निगडित आहेत. लहान मुलांच्या फुफ्फुसांच्या विकासावर त्याचा परिणाम होतो, वृद्धांना तो अधिक धोकादायक ठरतो. आरोग्य व्यवस्थेवरचा ताण वाढतो, कामकाजाचे दिवस कमी होतात, उत्पादकता घटते. म्हणजेच, प्रदूषण ही केवळ पर्यावरणीय समस्या नसून ती आर्थिक नुकसानाचाही मोठा घटक आहे.या सगळ्यात एक नवा, किंचित विडंबनात्मक (ळीपळल) पण अस्वस्थ करणारा बदल दिसू लागला आहे. मी स्वतःही आजकाल कुठेही बाहेर पडताना किंवा प्रवासाचे नियोजन करताना सर्वप्रथम एक्यूआय तपासतो. हॉटेल, वाहतूक, पर्यटनस्थळ यांच्याइतकीच 'तिथली हवा कशी आहे?' ही माहिती महत्त्वाची वाटू लागली आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत आपण अशा प्रकारे कधीच एक्यूआय तपासत नव्हतो. हवा हा एक 'गृहीत' धरलेला घटक होता. तो वेगळा तपासण्याची गरजच वाटत नव्हती. पण आज परिस्थिती बदलली आहे. ज्या शहरात आपण काही दिवस राहणार आहोत, तिथली हवा आपल्या आरोग्यावर तात्काळ परिणाम करू शकते, हे लक्षात घेणे आता आवश्यक झाले आहे. त्यामुळे प्रवास करताना एक्यूआय तपासणे, अधिक प्रदूषित वेळा टाळणे, आवश्यक असल्यास काळजी घेणे या सवयी लावून घेणे गरजेचे आहे. हवा किती 'वाईट' आहे, ते मोबाइलवरील प आपल्याला दर तासाला सांगतात. एक्यूआय तपासणे ही केवळ सवय नाही, तर आजच्या काळात एक गरज झाली आहे. पण त्याच वेळी ती एक इशाराही आहे. कारण ज्या समाजात 'स्वच्छ हवा' ही गोष्ट आधी तपासावी लागते, तो समाज काहीतरी मूलभूत गमावत आहे.या संदर्भात सरकारकडून काही प्रयत्न झाले आहेत. राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, बीएस-६ मानके... पण त्यांचे परिणाम फारसे दिसत नाहीत. कारण ही उद्दिष्टे बंधनकारक नाहीत आणि त्याबाबतच्या अंमलबजावणीत सातत्य दिसत नाही. विविध विभागांमध्ये समन्वयाचा अभाव आहे, आणि शहरांवर लक्ष केंद्रित करताना ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होते. घरगुती इंधन, लाकूड, कोळसा यांचा वापर अजूनही मोठ्या प्रमाणावर होतो, जो एक मोठा प्रदूषण स्रोत आहे. पण या घटकांवर गंभीरपणे काम करण्याऐवजी, लक्ष बहुतेक वेळा केवळ शहरांतील वाहतूक किंवा पराली जाळण्यावर केंद्रित केले जाते.याहूनही गंभीर गोष्ट म्हणजे वायूप्रदूषणाचा प्रश्न अजूनही राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आलेला नाही. निवडणुकीत तो निर्णायक मुद्दा ठरत नाही. परिस्थिती गंभीर झाल्यावर तात्पुरते उपाय केले जातात... कधी सम-विषम, कधी कृत्रिम पाऊस, कधी स्मॉग टॉवर्स. पण या उपाययोजनांमुळे मूळ प्रश्न सुटत नाही. शेतकऱ्यांवर, शेजारी राज्यांवर, किंवा हवामानावर... अशी जबाबदारी ढकलली जाते. या सगळ्या टोलवाटोलवीत सामान्य माणूस मात्र रोजच्या रोज प्रदूषित हवा श्वासात घेत राहतो. यात दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि आम आदमी पार्टीच्या नेत्या आतिशी मारलेना यांसारख्या नेतृत्वाकडून कधीकधी अशी विधाने ऐकायला मिळतात की त्यावर रडावे की हसावे, हा प्रश्न पडतो. उदाहरणार्थ, एक्यूआयला तापमानासारखा एक आकडा मानून तो कोणत्याही साधनाने मोजता येतो, असे सहजपणे सांगितले जाते. जणू काही एक्यूआय ही गुंतागुंतीची वैज्ञानिक पद्धती नसून, थर्मामीटरने तपासता येणारी साधी गोष्ट आहे! कधी परिस्थिती गंभीर असतानाही 'स्थिती नियंत्रणात आहे' असे सांगितले जाते, तर कधी सर्व दोष हवामानावर ढकलला जातो. अशा प्रकारच्या विधानांमुळे समस्या समजून घेण्याऐवजी तिचे हलकेकरण होते आणि शेवटी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात संभ्रम आणि अविश्वासच वाढतो.जगात काही देशांनी वेगळा मार्ग निवडला आहे. नॉर्वे, फिनलंड, स्वीडन, आइसलँडसारख्या देशांमध्ये स्वच्छ हवा ही केवळ घोषणा नाही, तर धोरणात्मक प्राधान्य आहे. तिथे ऊर्जा मोठ्या प्रमाणावर नूतनीकरणक्षम स्रोतांमधून येते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट आहे,

# डॉ.गीता शिनगारे यांनी एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याबद्दल जिजाऊ परिवाराकडून भव्य सत्कार,मराठा सेवा संघ बीड जिल्हा व राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आवसगाव यांच्या वतीने आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

मौजे आवसगाव ता.केज जि.बीड येथे दि.१६ एप्रिल वार गुरूवार रोजी राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आवसगाव,मराठा सेवा संघ बीड जिल्हा तसेच जिजाऊ परिवाराच्या महिला पदाधिकारी यांच्या वतीने औक्षण करून एमबीबीएस पदवी संपादन करणाऱ्या गुणवंत कु.डॉ.गीताताई बन्सी (आण्णा) शिनगारे यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.डॉ.गीताताई शिनगारे यांनी अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस ही पदवी गुणवत्तेसह उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल गावात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून,त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी मुख्य आयोजक गोविंद नाना शिनगारे,संतोष बापू शिनगारे आणि श्री. सुरेशराव खाडपे यांच्या हस्ते आदर्श



प्रेरणास्थान स्वराज्य प्रेरणा राजमाता जिजाऊ माँसाहेबांची भव्य प्रतिमा,शाल व पुष्पहार देऊन डॉ. गीताताई यांचा सन्मान करण्यात आला.तसेच त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमास डॉ.गीताताई यांचे पालक श्री.बन्सी (आण्णा) शिनगारे यांच्यासह संपूर्ण शिनगारे परिवार उपस्थित होता. याशिवाय गावातील मान्यवरांमध्ये श्री.भारत दादा शिनगारे,श्री.सुरेश खाडपे,श्री.काशिनाथ बाबा साखरे,श्री.गोविंद पवार (माजी सरपंच), श्री.विजयसिंह साखरे, श्री.कृष्णा साखरे,ॲड. सयाजी साखरे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे अध्यक्ष श्री.आकाश भैय्या आदमाने यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी डॉ.निता शिनगारे यांनी मनोगत व्यक्त करताना डॉ.गीताताई यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांचे परिश्रम, कुटुंबीयांचे पाठबळ तसेच गुरुजनांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले. त्यांनी या सर्वांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.तसेच जिजाऊ परिवारातील सदस्य संतोष बापू शिनगारे आणि गावातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास शोभा आणली.या सत्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी डॉ.गीताताई शिनगारे यांच्या यशाचे कौतुक करताना,त्यांनी भविष्यात आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजाची सेवा करण्यासाठी तत्पर असावे असे मनोगत प्रसंगी सांगितले व गोविंद नाना शिनगारे यांनी राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आवसगाव व मराठा सेवा संघ बीड जिल्हा सह जिजाऊ परिवाराच्या वतीने सत्कार केल्याबद्दल डॉ. गिता शिनगारे यांनी मनःपूर्वक आभार मानले संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# केज येथे पाऊणतास रस्ता रोको

## प्रशासनाच्या लेखी आश्वासनांतर आंदोलन मागे

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघातीय मृत्यूनंतर निर्माण झालेल्या शंकामय बाबीचीं सखोल चौकशी करा, कानडी रोड नादुरुस्त रस्ता चोवीस तासात दुरुस्त करा व लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृह १५ ऑगस्ट पूर्वी केज नगरपंच्यायत कडे हस्तान्तरीत करा या तीन प्रमुख मागण्यासाठी केज विकास संघर्ष समितीने शुक्रवारी केज तहसील कार्यालयासमोरील महामार्गावर पाऊणतास केलेले रस्ता रोको आंदोलन अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासानंतर मागे घेण्यात आले.

वरील तिन्ही मागण्यासंदर्भात प्रशासनाने दखल घेवून लेखी आश्वासन दिले. या अंतर्गत मयत तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघात व मृत्यूचीविशेष चौकशी स्थानिक गुन्हा शाखेकडे सोपवल्याचे सांगण्यात आले व घटनेचे संपूर्ण सत्य शोधून काढले जाईल असे सांगण्यात आले.

अपूर्ण असलेल्या कानडी रस्त्याचे दोन्ही बाजूचे पंखे भरुन येत्या २० एप्रिल पूर्वी रस्ता काम पूर्ण करण्यात येईल तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे काम १५ ऑगष्ट पूर्वी पूर्ण करून ते केज नगरपंचायत कडे सोपवले जाईल असे लेखी आश्वासन संबंधित यंत्रनेने दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, इंजि मोहनराव कराड, संपत वाघमारे, गौतम बचूटे यांच्यासह अनेक नागरिक सहभागी झाले होते.



# राज्यसभेनंतर आता विधान परिषद निवडणूकीचा बिगुल वाजला

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या ९ जागा रिक्त होत असून त्या जागासाठी १२ मे २०२६ रोजी मतदान होणार आहे. या ९ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून ३० एप्रिल रोजी अर्ज दाखल करणे २ मे रोजी छाननी होऊन व ४ मे रोजी अर्ज माघार घेण्याचा कालावधी आहे. तर १२ मे रोजी ५ वाजता मतमोजनी होऊन निकाल जाहिर होईल. काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांनी राजीनामा दिल्याने त्या जागी पोटनिवडणूक होत आहे. एकूणच १० जागासाठी निवडणूक होत आहे.सध्याच्या विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजप काही ना काही गेम करण्याची दाट शक्यता आहे. या निवडणुकीत भाजपच्या खात्यात ५, शिवसेना २, राष्ट्रवादी आणि महाविकास आघाडीकडे प्रत्येकी एक जागा येईल. त्यात अजितदादांच्या राष्ट्रवादीची १३ मतं अतिरिक्त



आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीकडे १७ मतं अतिरिक्त आहेत. ही अतिरिक्त मतं कुणाच्या पारड्यात पडतात आणि क्रॉस वोटिंगचा फायदा कुणाला होतो याविषयी मोठा मंथन सुरू आहे.राज्यसभेसाठी काँग्रेस आणि ठाकरेसेने कडून शरद पवार यांच्यासाठी महाविकास आघाडी म्हणून राज्यसभेची जागा सोडण्यात आली. तर आता विधान परिषदेसाठी काँग्रेस आग्रही आहे. विधान परिषदेत महाविकास आघाडीचे संख्याबळ वाढावे असा प्रयत्न सुरू आहे. महाविकास आघाडीकडे अतिरिक्त १७ मतं आहेत. अजून १० मतं मिळवल्यास आघाडीचा अजून एक सदस्य वाढू शकतो. अर्थात त्यासाठी मोठा कस लावावा लागणार आहे. महाविकास आघाडीने दहा मतं खेचून आणल्यास मात्र मोठा खेला होईल. महाविकास आघाडीचे दोन नेते विधान परिषदेवर निवडून जातील. राज्यसभेसाठी उद्धव ठाकरे यांच्या पक्ष प्रमुख दावेदार होता. पण त्यांनी ही जागा शरद पवार यांच्यासाठी सोडली. काँग्रेसनेही त्यांच्या पारड्यात मतं टाकली. आता विधान परिषदेवर उद्धव ठाकरे यांना पाठवायची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे काँग्रेसच्या अडचणी वाढल्या आहेत. पण जर तीनही पक्षांनी समन्वय साधत दहा मतं खेचून आणल्यास दोन नेते विधान परिषदेवर जाऊ शकतात. पण ही मोठी कसरत आहे. काँग्रेसने पाठिंबा नाही दिला तरी उद्धव ठाकरे हे सहज विधान परिषदेवर निवडून जाऊ शकतात. कार्यकाळ संपुष्टात आलेले सदस्य - संजय केनेकर, नीलम गोऱ्हे,उद्धव ठाकरे,संदिप जोशी,दादाराव केचे,अमोल मिटकरी, रणजीतसिह मोहिते पाटील,राजेश राठोड,शशिकांत शिंदे या सदस्यांची मुदत येत्या १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. तर प्रज्ञा सातव यांनी राजीनामा दिल्याने पोटनिवडणूक होत आहे.

# बाबासाहेबांचे संविधान सर्वांचेच रक्षण करतय-प्रा.अमोल वाघमारे

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान तुमचं आमचं सर्वांचं रक्षण करते त्या संविधानाच्या रक्षणासाठी आपण सर्वांनी सज्ज राहिला पाहिजे असं मनोगत प्रा अमोलकुमार वाघमारे यांनी संघर्ष मित्र मंडळ भंडारली, शिळफाटा आयोजित भीम जयंती उत्सवात केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी किशोर घाग हे होते सुरुवातीला सर्व मान्यवरांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध छत्रपती शिवाजी महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कृष्णा राठोड यांनी केले प्रतिमा पूजना नंतर मान्यवर वक्ते व अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला भीम जयंती निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्याना पारितोषक वितरण करण्यात आले.





समाज प्रबोधनकार व्याख्याते प्रा अमोलकुमार वाघमारे यांनी बाबासाहेबांचा बालपण,रामजी आंबेडकर यांचे योग दान,शिक्षण, परदेशातील शिक्षण, त्यांना शाहू राजे व सयाजी राजे यांनी केलेली मदत त्यांच्या आवडी निवडी , त्यांनी स्त्रिया, कामगार व भारतीय नागरिकांसाठी केलेल्या कार्याची महती विविध उदाहरणासह समजून सांगितली. चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, माणगाव परिषद, संविधानाची निर्मिती या सगळ्या ठळक बाबींचा आपल्या मनोगत मधून उलगडा केला व अधिक चांगल्या पद्धतीने बाबासाहेबांचे कार्य समोर उपस्थित होते त्यांना समजेल अशा भाषेमध्ये सांगितले अध्यक्षीय मनोगतामध्ये किशोर घाग यांनी बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वांना न्याय देण्याचे काम केलं असे उद्गार काढले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल जाधव यांनी केले शेवटी आभार तुळशीदास बाबर यांनी मानले कार्यक्रमास बंदिस सोनवणे, संदेश तायडे, पडळकर साहेब यांच्यासह भंडारली व गोठेघर परिसरातील तरुण युवक ,माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते संघर्ष मित्र मंडळ भंडारली शिळ फाटा च्यावतीने मोठ्या उत्साहात भीमजयंती साजरी करण्यात आली.

# कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून प्रत्येकाला विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न-पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

## केळझर येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे भूमीपूजन; सेलडोह येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे लोकार्पण

## आपले सरकार सेवा केंद्राच्या नवीन इमारतीचे लोकार्पण; छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे उद्घाटन





**दैनिक वादळ वार्ता**
**वर्धा । प्रतिनिधी**

राज्यातील गरीब, दुर्बल, शेतकरी, शेतमजूर, महिलांसाठी राज्य शासन विविध कल्याणकारी योजना राबवित आहे. शेतकऱ्यांसाठी किसान सन्मान योजना, महिलांसाठी उज्वला योजना, लाडकी बहीण, लखपती दिदी योजना, गरीबांसाठी घरकुल यासारख्या योजना राबवून प्रत्येक नागरिक महिलांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम राज्य शासन करीत असल्याचे प्रतिपादन पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

सिध्दीविनायक गणपती मंदिर, केळझर येथे पशुचिकित्सालयाचे भूमीपूजन, सेलडोह येथील पशुचिकित्सालयाचे लोकार्पण, ग्रामपंचायत येथील आपले सरकार सेवा केंद्राचे लोकार्पण व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत विविध लाभाचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, जिल्हाधिकारी वानमथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, माजी खासदार रामदास तडस, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, तहसिलदार शंकुतला पाराजे आदी उपस्थित होते.

गरीबांना सन्मानाने जगता यावे यासाठी प्रयत्न असून प्रत्येकाला रोजगार देण्याचे काम राज्य शासन करीत आहे. शासन राबवित असलेल्या प्रत्येक योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून लाभ देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे पुढे बोलतांना पंकजा मुंडे म्हणाल्या. प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणे विधानसभेत सुध्दा महिलांना आरक्षण देण्याचे नियोजन केले आहे. कलीयुगामध्ये दिशा देण्याचे कार्य महिला शक्ती करीत आहे, असेही त्या पुढे बोलतांना म्हणाल्या.हजारो नागरिकांना महाराजस्व अभियानाचा लाभ – डॉ.पंकज भोयरप्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती निमित्त सर्व प्रथम वर्धा जिल्ह्यात राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवाडा राबविण्यात आला. हीच संकल्पना घेऊन राज्यात सेवा पंधरवाडा उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. आता महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानातून प्रत्येक नागरिकांचे प्रश्न स्थानिक स्तरावर सोडविण्यासोबतच विविध योजनेचे लाभ देण्यात येत आहे. या अभियानामुळे हजारो नागरिकांना लाभ होत आहे. या लाभ वितरणाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी यांनी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महसूल विभागाच्यावतीने संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य, जात प्रमाणपत्र, विविध दाखले, कृषि विभागाच्यावतीने लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वितरण, मुलींना सायकल वितरण, दिव्यांगांना लाभाचे वितरण यासहा विविध योजनेचे लाभ व प्रमाणपत्र तसेच दाखले वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसिलदार शंकुतला पाराजे यांनी केले. केळझर व सेलू येथील नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अग्निदिव्यातून सुलाखून निघालेले व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर–संजय गजपुरे

**दैनिक वादळ वार्ता**
**नागभीड । प्रतिनिधी**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वतःच्या मन, मेंदू आणि मनगटावर विश्वास ठेवत अहोरात्र परिश्रम करून ज्ञानसाधना करणारे, अग्निदिव्यातून सुलाखून निघालेले व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ . बी . आर आंबेडकर असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संजय गजपुरे यांनी केले.किटाडी (बो.) येथील प्रशांत विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणातून ते बोलत होते. दीन, दलित, वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचे सामर्थ्य देणारे आणि जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना घडवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय लोकशाहीचे जनक आहेत. आजच्या



विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी, असेही गजपुरे यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाला भाजपा तालुका महामंत्री व शाळेचे माजी विद्यार्थी जगदिश सडमाके यांची विशेष उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून किटाडी (बो.)चे सरपंच छगन कोलते, उपसरपंच दीपक ठाकरे, चिंधीचकचे सरपंच हरिदास वरठे, उपसरपंच प्रदीप समर्थ, शाळेचे माजी मुख्याध्यापक निकुरे, प्रदीप मेश्राम, भाग्यश्री पेंदाम, सुशिलाबाई नक्षिणे, रुपाताई गुरनुले, हरिदास मेश्राम आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.विशेष अतिथी जगदिश सडमाके यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा गौरव करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यासातून विविध क्षेत्रात यश मिळवावे, असे आवाहन केले. यावेळी सरगम गुरनुले, मंजिरी बोरकर, प्राजक्ता रामटेके व आरजू शिंदे या विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक कावळे यांनी केले, तर आभार सहाय्यक शिक्षक विनोद बोरकर यांनी मानले. सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षिका सोनी डांगे यांनी केले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिवसा पंचायत समितीत ‘एसीबी’चा दणका; विहीर मंजुरीसाठी लाच मागणारा तांत्रिक सहाय्यक अटकेत

**दैनिक वादळ वार्ता**
**अमरावती । प्रतिनिधी**

तिवसा पंचायत समितीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कारवाई करत विहीर मंजुरीच्या कामासाठी लाच मागणाऱ्या तांत्रिक सहाय्यकाला अटक केली आहे. या कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आशीष तुळशीराम डिडेंकर (वय ४४, रा. गुरुदेवनगर, मोर्शी) असे अटकेत घेतलेल्या तांत्रिक सहाय्यकाचे नाव आहे. तक्रारदाराने आपल्या आईच्या नावावर असलेल्या शेतात नवीन विहीर मंजूर करून घेण्यासाठी कृषी विभागाच्या एमआरईजीएस योजनेंतर्गत अर्ज केला होता. या कामासाठी आवश्यक मंजुरी देऊन नाव यादीत समाविष्ट करण्यासाठी डिडेंकर यांनी १० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे.या प्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. पडताळणीत आरोपीने तडजोडीअंती ५ हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एसीबीने सापळा रचला. मात्र, कारवाईदरम्यान आरोपीने प्रत्यक्ष लाच स्वीकारली नसली तरी लाच मागणी सिद्ध झाल्याने त्याला अटक करण्यात आली.या प्रकरणी तिवसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक नीलिमा सातव यांच्या मार्गदर्शनाखाली उपेंद्र थोरात, रोहिला कडू, आशीष जांभुळे, प्रमोद रायपुरे, सतीश किडुकले, राजेश बहिरट आदींच्या पथकाने केली.दरम्यान, शेतकऱ्यांना विहिरीसारख्या मूलभूत सुविधांसाठीही लाच मागितली जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. या कारवाईमुळे लाचखोर अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून अशा प्रकारांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# दौंडमध्ये ‘जल्लोष भीमजयंतीचा महोत्सव विचारांचा’; पत्रकार मिलिंद शेंडगे यांचा गौरव

**दैनिक वादळ वार्ता**
**पाटस । प्रतिनिधी**

दौंड येथे न्यू महाराष्ट्र पँथर सेनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जल्लोष भीमजयंतीचा महोत्सव विचारांचा हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ‘पत्रकार मिलिंद शेंडगे यांना पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

पत्रकार मिलिंद शेंडगे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न निर्भीडपणे मांडले असून, समाजातील वास्तव परिस्थिती लोकांसमोर आणण्याचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीची दखल घेत न्यू महाराष्ट्र पँथर सेनेने त्यांचा सन्मान केला. गेल्या पाच वर्षांपासून हा महोत्सव सातत्याने आयोजित करण्यात येत असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि वैचारिक जागृती घडवणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. यंदा कार्यक्रमाची सुरुवात ११ एप्रिल रोजी ‘सन्मान स्त्री शक्तीचा होम मिनिस्टर’ या उपक्रमाने झाली. महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ मिळावे या हेतूने हा स्पर्धात्मक कार्यक्रम घेण्यात आला. १२ एप्रिल रोजी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. १४ एप्रिल रोजी जयंती दिनी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे अन्नदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच महापुरुषांचे विचार जनतेपर्यंत पोहोचावेत यासाठी पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यू महाराष्ट्र पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष पँथर जयदीप बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष श्रीकांत थोरात, उपाध्यक्ष अर्जुन गायकवाड तसेच सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास दौंड परिसरातील नागरिक, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**“सर्वसामान्य जनतेच्या आणि कामगारांच्या हक्कासाठी आमची संघटना सदैव तत्पर आहे. या जयंती उत्सवाच्या माध्यमातून समाजात वैचारिक परिवर्तन घडवण्याचा आमचा मानस आहे,असे मत संस्थापक अध्यक्ष पँथर जयदीप बगाडे यांनी व्यक्त केले.**

# नागपुरातील रात्र महाविद्यालयात ‘दशविध ज्ञानदीपां’ची प्रज्वलना

**दैनिक वादळ वार्ता**
**नागपूर । प्रतिनिधी**

चिटणवीसपुरा, महाल येथील आर्ट्स अँड कॉमर्स नाईट कॉलेजमध्ये शैक्षणिक सत्र २०२५–२६ अंतर्गत दर शनिवारी आयोजित साप्ताहिक व्याख्यानमालेची उत्साहात सांगता झाली. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मार्क्सवाद, आंबेडकरविचार, साहित्य आणि व्यवस्थापन अशा विविध ज्ञानशाखांचा संगम घडवणाऱ्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये प्रबोधनाची नवी चेतना निर्माण केली.महाविद्यालयाचे सभागृह दर शनिवारी विचारमंथन, प्रश्नोत्तरे आणि जिज्ञासेने भारलेले दिसत होते. प्राचार्य डॉ. हिरालाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या व्याख्यानमालेस ग्रंथपाल डॉ. अशोक खोबरागडे आणि क्रीडा संचालक डॉ. राजेश बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.दिवसभर काम करून रात्री



शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, विविध विषयांबाबत व्यापक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि ते जबाबदार नागरिक घडावेत, या उद्देशाने ही व्याख्यानमाला राबविण्यात आली. तसेच प्राध्यापकांच्या अध्यापन कौशल्यात प्रगल्भता यावी, संवादकौशल्य वाढावे आणि विषयांवरील प्रभुत्व अधिक दृढ व्हावे, यावरही भर देण्यात आला.या उपक्रमाच्या अनुषंगाने विविध विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. त्यात प्रा. गौरव गजबे, डॉ. अर्चना अंतुरकर, प्रा. सुजीत जाधव, प्रा. लवकुमार हारामी, डॉ. लक्ष्मी चरपे, प्रा. मोहनिश आपुरकर, डॉ. शिल्पा मेश्राम, प्रा. रोहिणी पिंपळकर, प्रा. अरविंद गिरडे, प्रा. राजेश सोनकुसरे आणि प्रा. नलिनी बन्सोड यांनी संशोधनपर पेपर सादर केले.उपक्रमाच्या यशात वंदनाताई कुत्तरमारे आणि आकाश सोमकुवर यांचे विशेष योगदान राहिले. या यशानंतर महाविद्यालय प्रशासनाने पुढील शैक्षणिक वर्षात हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा निर्णय घेतला आहे.

# सुधीर मुनगंटीवारांचा ‘ऑन द स्पॉट’ निकाल वनमजुरांचा ८ महिन्यांचा वेतनाचा वनवास संपला

## प्रविण मोहुर्ले व पंकज लाडवे यांचा पुढाकार

**दैनिक वादळ वार्ता**
**मुल । प्रतिनिधी**

प्रशासकीय दिरंगाईमुळे गेल्या ८ महिन्यांपासून वेतनाच्या प्रतीक्षेत असलेल्या जिल्ह्यातील शेकडो वनमजुरांना अखेर न्याय मिळाला आहे. माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या आक्रमक आणि तत्पर हस्तक्षेपामुळे हा गंभीर प्रश्न अवघ्या काही तासांत मार्गी लागला. मुनगंटीवारांच्या या 'क्शन मोड'मुळे चंद्रपूर वनविभागातील कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या पगाराचा मार्ग मोकळा झाला आहे.



चंद्रपूर वनविभागात कार्यरत असलेले संगणकचालक, मजूर, रोपवाटिका कर्मचारी आणि चौकीदार यांचे जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील वेतन रखडले होते. 'वेज बिल मॉनिटरिंग सिस्टीम'मध्ये तांत्रिक अडचणी असल्याचे सांगत प्रशासन वेळकाढूपणा करत होते. मात्र, यामुळे मजुरांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती. ही व्यथा मजुरांनी मांडताच मुनगंटीवार यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली.या बैठकीत मुनगंटीवार यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत प्रशासनाला यासंदर्भात विचारणा केली. मजुरांच्या घामाचा पैसा रोखून धरणे खपवून घेतले जाणार नाही, असा सज्जड दम देत त्यांनी मुख्य वनसंरक्षकांना तात्काळ निधी वितरणाचे आदेश दिले. त्यांच्या या रेट्यामुळे प्रशासनाने प्रलंबित देयके तत्काळ निकाली काढण्याचा निर्णय घेतला. तसेच, जे मजूर आर्थिक अडचणीमुळे कामावर येऊ शकले नव्हते, त्यांना सन्मानाने पुन्हा कामावर रुजू करून घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.मुनगंटीवार यांच्या संवेदनशील भूमिकेमुळे शेकडो मजुरांच्या घरांत पुन्हा चूल पेटणार असून त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नही सुटला आहे. केवळ एका बैठकीत ८ महिन्यांचा गुंता सोडवण्याच्या मुनगंटीवारांच्या या कार्यशैलीचे जिल्ह्यात सर्वत्र कौतुक होत आहे. येत्या दोन दिवसांत सर्व कर्मचारी पुन्हा कामावर हजर होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला असून मजुरांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# आरोग्य-सामाजिक क्षेत्रातील संस्थांच्या सहकार्याने आरोग्य सेवा तळागाळात पोहोचणार-स्वानंद सोनार

## जिल्ह्यातील २५ स्वयंसेवी संस्था, रुग्णालय प्रतिनिधींची बैठक

## ‘निरामय बीड अभियान’ वर सविस्तर चर्चा

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, रुग्णालये व स्वयंसेवी संघटनांनी एकत्रितपणे कार्य केल्यास आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचू शकते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे राज्यस्तरीय वैद्यकीय समन्वयक डॉ. स्वानंद अरुण सोनार यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभाग्रहात आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील समन्वयासाठी आयोजित मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या विशेष बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस मा.जिल्हाधिकारी विवेक जॉनसन , निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , डॉ. अजित विसपुते उत्तर महाराष्ट्र विभागीय समन्वयक, युवराज महाजन, संस्था समन्वयक, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष बीड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कागदे चैतन्य , राहुल चव्हाण व गणेश गिराम जिल्हा समन्वयक आणि जिल्ह्यातील २५ स्वयंसेवी संस्था व प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



डॉ.सोनार म्हणाले, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष सर्व उपक्रमांना आवश्यक समन्वय व सहकार्य देण्यासाठी कटिबद्ध आहे. गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळवून देताना शासकीय निधीचा अपहार करणारे तथाकथित रुग्णसेवक तसेच अशा गैरप्रकारांना सहाय्य करणारी अथवा खोटी रूग्णप्रकरणे सादर करून शासकीय पैशाचा अपहार करणारी रुग्णालये, योजनेसह संलग्नता प्राप्त करून देण्यासाठी पैसे मागणारे मध्यस्थ या सर्वांवर कायदेशीर कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी कळविले ,सोबतच मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत गेल्या वर्षभरात पुरवलेल्या सेवा, विशेष उपक्रम, व वितरीत निधी या संदर्भात संक्षिप्त आढावा देण्यात आला.जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी दरमहा सामुदायिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन रुग्णालयांनी करावे, त्यात सेवाभावी संस्था नी व्यापक स्वरूपात सहभागी व्हावे, कॅन्सर आरोग्य तपासणीचे प्रमाण वाढवण्यासाठी फिरत्या चिकित्सा पथकांचा वापर वाढवावा, असेही त्यांनी आवाहन केले.

महिलांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण धोरण निश्चित करण्यात आले. महिला सक्षमीकरण, पोषण, आरोग्य जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत चर्चा झाली. ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या आरोग्य समस्यांचा विचार करून त्यांच्यासाठी शुश्रूषा सेवा, निवारा केंद्रे स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात आला. या घटकांसाठी विशेष आरोग्य सुविधा निर्माण करण्यावर सर्व प्रतिनिधींनी एकमत दर्शवले.

जिल्ह्यातील उसतोड कामगारांच्या आरोग्य विषयक प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली, तसेच उसतोड महिला , एकल महिला , घरकामगार महिला ई. साठी विशेष प्रकल्प राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.प्रशासन ,रुग्णालये व स्वयंसेवी संस्थांनी मिळुन वाढत्या मानसिक आरोग्य समस्यांच्या पार्श्वभूमीवर समुपदेशन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.बैठकीदरम्यान ‘निरामय बीड अभियान’ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर सादरीकरण व सविस्तर चर्चा सत्र करण्यात आले. या अभियानांतर्गत सर्वसमावेशक व आजार प्रतिबंधक आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यावर तज्ज्ञांनी मते व्यक्त केली. जिल्ह्याचा आरोग्य निर्देशांक उंचावण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. बैठकीत जिल्ह्याच्या सर्वांगीण आरोग्याबाबत सविस्तर चर्चा झाली.गत काही वर्षापासून कॅन्सर चे प्रमाण वाढत आहे , विशेषतः महिलांना होणाऱ्या कॅन्सर च्या प्रमणात खूप वाढ झाली आहे, आणि त्याचा परिणाम पूर्ण कुटुंबाच्या स्वास्थ्यवरती पडत आहे.याच्या प्रमाणात घट करायची असेल तर प्राथमिक तपासणी करून लवकरात लवकर त्याचे निदान होणे आवश्यक आहे. यासाठी निरामय बीड कृतीदल डॉ. स्वानंद सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करून मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष बीड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कागदे चैतन्य, श्री सेवा भावी संस्थेच्या अध्यक्ष ड भाग्यश्री ढाकणे, भगवंतकुमार फौंडेशन चे अध्यक्ष ज्योतिबा नन्नवरे, भगवंत पळवडे (श्री ज्ञानेश्वर बहुद्देशीय सेवाभावी संस्था), बबनराव माने (जय महाराष्ट्र उसतोड कामगार संघटना ) यांच्यावर या कृतीदलाच्या अंमलबजवणी ची जबाबदारी देण्यात आली. या बैठकीस श्री ज्ञानेश्वर बहुद्देशीय सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून श्री पळवडे यांनी रुग्ण आणि हॉस्पिटल मध्ये समन्वयक म्हणून काम करू, तसेच ग्रामीण भागात तांडे वाडी वस्ती वर जाऊन जनजागृती, प्रचार प्रसार विविध कॅम्पचे आयोजन , लोकसहभागातून डोनेशन, कॅम्प दरम्यान विविध वस्तू जमा करून देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले. श्री सेवा भावी संस्थेच्या अध्यक्ष ड भाग्यश्री ढाकणे यांच्या वतीने बीड जिल्यातील महिलांच्या आरोग्य सुदृढ करण्यासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन केल. या बैठकी बाबत श्री. शरद झोडगे, डॉ. भीमसिंग मिसाळ, डॉ. राहुल सारडा , डॉ. प्रशांत सानप , डॉ. आशिष गरजे डॉ. विजयकुमार घोळवे, डॉ. प्रदीप शेळके यांनी आपापली मते मांडून समाधान व्यक्त केले व निरामय बीड उपक्रम यशस्वी करण्याचे मानस व्यक्त केले.

# शेतकऱ्यांनी तात्काळ नोंदणी करून फार्मर आयडी काढावा-प्रा.बबनराव आंधळे

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार रासायनिक खताच्या वितरणात पारदर्शकता आणण्या साठी फार्मर आयडी प्रणाली राबवण्यात येत आहे.याशिवाय फार्मर आयडी असल्याशिवाय कोणत्याही शेतकऱ्याला रासायनिकखत मिळणार नाही.जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी शासनाच्या या उपक्रमास सहकार्य करून फार्मर आयडीची तात्काळ नोंदणी करावी जेणेकरून खत वितरण सुरळीत व पारदर्शकपणे होईल असे आवाहन ग्रामीण संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार व राज्यसंचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे.फार्मर आयडी अनिवार्य आहे. शेतकऱ्यांना खत खरेदी साठी फार्मर आयडी काढणे बंधनकारक आहे फार्मर आयडी शिवाय खत वितरण केले जाणार नाही.




**अनुदानित खतासाठी सक्ती**

रासायनिक खतावरील अनुदानाचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक आहे खताचा काळाबाजार व अनावश्यक लिंकिंग रोखण्यासाठी ही प्रणाली प्रभावी ठरेल.पारदर्शक व नियोजनबद्ध वितरण सुनिश्चित होईल. डिजिटल नोंदणी प्रणाली शेतकऱ्याची माहिती (जमीन,पीक,योजना) डिजिटल स्वरूपात नोंदवली जाईल खत खरेदी करताना आयडी स्कॅन / क्रमांक वापरला जाईल.थेट लाभ हस्तांतरण खत अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल ही तर शासकीय योजनां साठी फार्मर आयडी आवश्यक राहील. जिल्ह्यात फार्मर आयडी नोंदणी मोहीम सुरू आहे.सर्व तालुक्यांमध्ये जनजागृती व नोंदणी शिबिर या आयोजित करण्यात येत आहेत फार्मर आयडी कसा काढावा ग्रामपंचायत कार्यालय सीएससी (कॉमन सर्विस सेंटर) सहाय्यक कृषी अधिकारी /कृषी विभाग कार्यालय शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करावी खत खरेदी करताना आयडी सोबत ठेवावा अधिक विक्रेत्याकडूनच खत खरेदी करावे व बिल घ्यावे खरीप हंगाम २०२६ पासून हा नियम काटेकोरपणे लागू केला जाणार आहे याची शेतकऱ्याने दखल घ्यावी सहकारी संस्था व खाजगी विक्रेत्यामार्फत ही याच नियमानुसार खत वितरण होईल असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

# माजलगावात श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त व्याख्यानाचे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने भगवान श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त भव्य व धार्मिक वातावरणात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन दि. १८ एप्रिल २०२६ रोजी रात्री ६ ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. भगवान श्री परशुराम कार्य या विषयावर होणाऱ्या या व्याख्यानामुळे समाजातील तरुण पिढीला संस्कार व परंपरेची प्रेरणा मिळणार असुन व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक श्री विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहणार आहेत.



भगवान परशुराम हे शौर्य, धर्मनिष्ठा व न्यायप्रियतेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या जीवनातील आदर्श व कार्य आजच्या काळातही मार्गदर्शक ठरत असल्याने या विषयावर सखोल मार्गदर्शन व्हावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेशकाका मोगरेकर हे तर व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहून भगवान परशुराम यांच्या कार्याचा ऐतिहासिक, सामाजिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून सांगणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश भानप (सचिव, श्री सदगुरू सेवा समिती, पंढरपूर), डॉ. स्वानंद कुलकर्णी (नेत्रतज्ञ, माजलगाव) हे कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम दि. १८ एप्रिल २०२६ रोजी श्री दत्त मंदिर, समित्र कॉलनी, माजलगाव येथे पार पडणार असून मोठ्या संख्येने ब्राह्मण समाजातील बांधव-भगिनींनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे समाजातील एकोपा वृद्धिंगत होण्यासोबतच धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचे जतन होणार असुन युवा पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरत आहेत. दरम्यान व्याख्यानानंतर महाआरती होईल व तद्नंतर प्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे.

# केज शहरामध्ये ‘बुद्धंम शरणम् गच्छामि’ संगीतमय महानाट्याचे भव्य आयोजन,फुले आंबेडकर जयंतीनिमित्त मोफत कार्यक्रम

## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे –भाई मोहन गुंड



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त केज शहरात ‘बुद्धंम शरणम् गच्छामि’ या संगीतमय महानाट्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.भारतीय शेतकरी कामगार पक्ष,क्रांतीसिंह नाना पाटील प्रतिष्ठान व महापुरुष जन्मोत्सव समिती,केज यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडणार आहे.रविवार,दि.१९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६-३० वाजता जयभवानी चौक येथील मुक्ताई फंक्शन हॉलमध्ये कार्यक्रमास सुरुवात होणार असून महानाट्याचे सादरीकरण सायंकाळी ७-०० वाजता होईल.हैद्राबाद येथील अभ्युदय आर्ट्सअकादमी चे २२ नाट्यकलावंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्षमय प्रवास हिंदी भाषेतून प्रभावीपणे सादर करणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्धाटन ज्येष्ठ नेते रणजितसिंह पाटील तसेच माजी पंचायत समिती सभापती राजेसाहेब पापा देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. विविध क्षेत्रातीलमान्यवर या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.या संगीत मय महानाट्यासाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला असून महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था करण्यात आली आहे. केज शहरात प्रथमच अशा प्रकारचे भव्य आयोजन होत असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रेरणादायी महानाट्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजक शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी केले आहे.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाई अशोक रोडे,अड.निखील बचुटे,रंजित घाडगे,प्रदीप गायकवाड,शेख रज्जाक, अक्षय हजारे,गुड्डू खतीब, मंगेश देशमुख,राजेभाऊ गुंड,अजिंक्य माने,नावेद मुलानी,दत्ता वाघमारे, शाम चिंचोलीकर, रामलिंग पाटील आदींनी परिश्रम घेतले आहेत.

# नवापूरमध्ये वनविभागाची मोठी धडक; बिबट्याच्या कातडीची तस्करी उधळली, पाच जण गजाआड!





**दैनिक वादळ वार्ता**
**रवींद्र वळवी । मोलगी**

वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो मुंबई आणि नंदुरबार वनविभागाच्या संयुक्त पथकाने एक धाडसी कारवाई करत बिबट्याच्या कातडीची तस्करी करणारी टोळी नवापूरमध्ये जेरबंद केली आहे. नवापूर एमआयडीसी परिसरात सापळा रचून केलेल्या या कारवाईत पाच संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून बिबट्याची कातडी आणि तस्करीसाठी वापरलेली चार वाहने जप्त करण्यात आली आहेत.

१५ एप्रिल २०२६ रोजी बिबट्याच्या कातडीची अवैध विक्री किंवा तस्करी होणार असल्याची खात्रीशीर माहिती वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो मुंबई आणि सहायक वनसंरक्षक रोशन बुवा यांच्या पथकाला मिळाली होती. या माहितीची गंभीर दखल घेत, वनविभागाच्या विविध पथकांनी नवापूर एमआयडीसी परिसरात दबा धरून बसले होते. संशयित आरोपी मुद्देमालासह घटनास्थळी येताच पथकाने झडप घालून त्यांना शिताफीने ताब्यात घेतले.तस्करांकडून बिबट्याची कातडी जप्त करण्यात आली आहे. तसेच, तस्करीसाठी वापरण्यात येणारी खालील वाहनेही वनविभागाने ताब्यात घेतली आहेत त्यात मारुती स्विफ्ट (त्र्या २६ -१५१३)

युनिकॉर्न मोटारसायकल (GJ 26 P9668)

डिस्कवर मोटारसायकल (MH 39 Q4460)

स्प्लेंडर मोटारसायकल (GJ 22 M1447) यांचा समावेश आहे.

पकडण्यात आलेल्या पाचही आरोपींना नवापूर येथील मध्यवर्ती रोपवाटिकेमध्ये नेऊन त्यांची कसून चौकशी करण्यात आली. वनपाल वडकळंबी यांनी भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या विविध कलमांन्वये (कलम ९, ३९, ४८अ, ४९ब, ४४, ५० आणि ५१) गुन्हा नोंदवला आहे. आरोपींची शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

ही यशस्वी कामगिरी धुळे वनवृत्ताच्या वनसंरक्षक नीनू सोमराज, नंदुरबारचे उपवनसंरक्षक संतोष सस्ते आणि विभागीय वनाधिकारी (दक्षता) सदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत सहायक वनसंरक्षक रोशन बुवा, वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो ची टीम, तसेच नवापूर, नंदुरबार, चिंचपाडा आणि शहादा पथकातील वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षकांनी महत्त्वाची भूमिका बजावली.वनविभागाच्या या धडक कारवाईमुळे वन्यजीव तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077